Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे,
स.नं.८३२-ए, फा.प्लॉट नं.१७८, व
१७९ बालचित्रवाणीजवळ,
आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या
मागे, भांबूर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्वाचे / तातडीचे

क्र.रा.मं./परीक्षा-७/735
दिनांक- १८/०२/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:- **फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.**

संदर्भ:- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण–२०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२, दि.२४/११/२०१७.
२. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.कशिमं/शारेप/सहा/२०२५/१३०० दि.०४/१२/२०२५.
३. या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा–७/१६६ दि.१६/०१/२०२६ चे पत्र
४. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे संकीर्ण–३८२६/प्र.क्र.०३/एस.डी.२,दि.३०/०१/२०२६ चे पत्र
५. या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा–७/४५२ दि.०२/०२/२०२६ चे पत्र
६. शासनाचे क्रमांक संकिर्ण ३८२६/प्र.क्र.०३/एसडी-२ दिनांक १३/०१/२०२६
७. या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा–७/६४२ दि.१४/०२/२०२६ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, शासन पत्र संदर्भ क्र.४ नुसार फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे दिनांक १८/०२/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

शासनपत्र संदर्भ क्र.६ नुसार शास्त्रीय कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देणाऱ्या एकूण ४५ संस्थांच्या यादीमध्ये नव्याने १३ संस्थांचा समावेश केला आहे. सदर बाब संदर्भ क्र.७ नुसार आपणांस कळविले आहे.

सबब, फेब्रुवारी- मार्च २०२६ च्या इ.१० वी परीक्षेसाठी शास्त्रीय कला, लोककला व चित्रकला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्याचा कालावधी विचारात घेता व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून सदर प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्यास दि.२८/०२/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

तरी उपरोक्तनुसार सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरून याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही, याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

(मा.अध्यक्ष, राज्य मंडळ यांच्या मान्यतेने)

Mali
(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-४

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –
मा.व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.

प्रत माहितास्तव सादर,

१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२.
२. मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१.
३. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे – ३०.
४. मा. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई –०१.
५. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई – ०१.

क्र.मुंविमं माध्य,परीक्षा /७१
वाशी, नवी मुंबई-४००७०३.
दिनांक - २१/०२ /२०२६

प्रतिः-
मुख्याध्यापक / प्राचार्य,
मुंबई विभागीय कार्यकक्षेतील
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा.
मुंबई/बृहमुंबई/ठाणे/पालघर/रायगड जिल्हे

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापकांनी आपल्या स्तरावर नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(ज्योत्स्ना शिंदे पवार)
विभागीय सचिव (प्र.)
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी 400703